पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - २०

**सभावृत्तांत**

दिनांक - **२३/०२/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२३/०२/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.मंगला अशोक कदम
७. मा.बनसोडे राजू विश्वनाथ

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.५) खेळाडू दत्तक योजनेतील रेशनकार्ड ही अट शिथिल करणेबाबत – मा.मंगला कदम, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) आंतरराष्ट्रीय क्रीडा अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) पुणे जिल्हा स्पोर्टस कराटे असोसिएशन, चिंचवड पुणे – ३३ यांची महिला / मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणेकामी मागील वर्षीचे दराने थेट पध्दतीने नेमणुक करणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.भिमाबाई फुगे　　　　　　　　　　　　अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २३/०२/२०१८ ची पाक्षिक सभा (कार्यपत्रिका क्र.२०) ही शुक्रवार दिनांक ०९/०३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - २०

**सभावृत्तांत**

**(** दिनांक **२३/०२/२०१८** ची तहकूब सभा **)**

दिनांक - **०९/०३/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **२३/०२/२०१८** ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **०९/०३/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.मंगला अशोक कदम
७. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **०९/०२/२०१८ व १२/०२/२०१८** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ९४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०९/०३/२०१८ विभाग - क्रीडा
सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३२/२०१८, दि.०२/०२/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व पुणे डीस्ट्रीक्ट अमेच्युअर ॲक्वाटिक असोसिएशन यांच्या मान्यतेने व पिंपरी चिंचवड स्विमींग असोशिएशन यांचे सहकार्याने, माहे फेब्रुवारी/मार्च २०१८ मध्ये, कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम जलतरण तलाव, नेहरूनगर पिंपरी १८ येथे महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.५,६९,०३०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदर खर्चातील, स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.८०,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.३०,०००/- हा खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित

र.रु.४,५९,०३०/- हा खर्च क्रीडा विभागाचे, महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मान चिन्हे, मेडल्स खरेदी, पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, निमंत्रण पत्रिका व प्रमाण पत्रे छपाई इ.कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९५ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०९/०३/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/५/कावि/७/२०१८, दि.०८/०२/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी अंदाजपत्रकात क्रिडा अनुदाने या लेखाशिर्षावर र.रू.३०,००,०००/- तरतुद केली जाते. पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरातील (हद्दीतील) ख-या अर्थाने मानव हिताच्या दृष्टीकोनातून काम करणा-या सर्व संस्था/ मंडळे इत्यादी मतिमंद, अपंग, अंध, कुष्ठरोगी, मुकबधीर, वृध्दाश्रम, अनाथालय इ. संस्थांना प्रत्येकी र.रू.३,००,०००/- पर्यंत अनुदान वाटप केले जाते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन अनुदान देणेकामी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार ८ संस्थांनी अर्ज केलेले होते. सदर सर्व संस्थांचे प्रत्यक्ष जागेवर मुळ कागदपत्रांची तपासणी केली असता क्रिडा धोरणानुसार त्यापैका फक्त एक संस्था अनुदान अदा करणेकामी पात्र झालेली साई संस्कार संस्था संभाजीनगर यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अनुदान र.रू.२,९०,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्वद हजार फक्त) अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९६ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०९/०३/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक : मा.मंगला कदम अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/३६०/२०१८, दि.०७/०२/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, आंतर शालेय ८ कला व गिर्यारोहण स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्यानुषंगाने, विद्यार्थ्यांना द्यावयाचा खाऊ=बिस्किटे/केळी खरेदी, कला व गिर्यारोहण स्पर्धा पुस्तिका छपाई, चित्रकला कागद खरेदी, फ्लेक्स बॅनर, ट्रॉफ़िज, निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्र छपाई इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून खरेदी करणेस तसेच प्रेक्षागृह भाडे, पी.एम.पी.एम.एल.बस भाडे कामी येणा-या अंदाजे खर्च र.रू.५,४९,३९२/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदर खर्च क्रीडा निधी मधील, वार्षिक

स्पर्धा, क्रीडा कला व क्रीडा कला साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस, तसेच चित्रकला, लेझीम व गिर्यारोहण या स्पर्धा अनुषंगाने स्टेज, मंडप टेबल, खुर्च्या इ. खर्च स्थापत्य विभाग, संबंधित प्रभाग व विद्युत स्पीकर, माईक व्यवस्था खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभागातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९७ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०९/०३/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४अ/कावि/३८/२०१८, दि.०४/०२/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुना डीस्ट्रीक्ट फुटबॉल असोसिएशन चे व वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांचे मान्यतेने व आरंभ सोशल फौंडेशन, चिंचवड स्टेशन, पुणे सहकार्याने, महापौर चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा २०१७-१८ या माहे फेब्रुवारी/मार्च २०१८ या कालावधीत राजर्षी शाहू महाराज क्रीडांगण शाहूनगर, चिंचवड १९ येथे आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.२३,५०,५००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदर खर्चातील, स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.६,०८,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.५,००,०००/- हा खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.१२,४२,५००/- हा खर्च क्रीडा विभागाचे, महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मान चिन्हे, मेडल्स खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, निमंत्रण पत्रिका व प्रमाण पत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९८ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०९/०३/२०१८

सुचक : मा.मंगला कदम अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.मंगला कदम, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव -

खेळाडू दत्तक योजनेसाठी खेळाडूंना रेशनकार्डची अट शिथिल करुन शहरातील खेळाडूंचा ५ वर्षाचा बॉन्ड घेऊन सदर खेळाडूंना या योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९९ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०९/०३/२०१८

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

क्रीडा समिती सदस्य व क्रीडा अधिकारी वर्ग यांचा आंतरराष्ट्रीय क्रीडा आभ्यास दौरा ऑलिंपिक ग्राम अथेन्स – युरोप येथे आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०० विषय क्रमांक - ०७

दिनांक - ०९/०३/२०१८

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३२, दि.३०/०१/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणेकामी पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन, चिंचवड, पुणे – ३३ यांची १) वयोगट ५ ते १६, २) वयोगट १७ ते २६, ३) वयोगट २७ ते ४५ या तीन वयोगटातील महिला/मुलींना पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन चिंचवड, पुणे – ३३ यांना वस्ती पातळीवर प्रशिक्षण देणेकामी यापुर्वी महानगरपालिकेतर्फे नेमणुक करणेत आली होती. वस्तीपातळीवरुन सदरचे प्रशिक्षण सुरु करणेबाबत वारंवार मागणी होत आहे. त्यामुळे तातडीने प्रशिक्षण सुरु करणे आवश्यक आहे. पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन, चिंचवड, पुणे – ३३ हे मागील वर्षीच्या दरात काम करणेस तयार आहेत. त्यामुळे मागीलवर्षीच्याच दराने चालू वर्षी त्यांना काम देणे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे आहे. तसेच त्यांनी चांगल्याप्रकारे काम केले आहे. त्यामुळे सन २०१७-१८ करीता पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन, चिंचवड, पुणे – ३३ यांची महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणेकामी मागील वर्षीचे दरात थेट पध्दतीने नेमणुक करणेस व सदरचे प्रशिक्षण हे मागील वर्षीच्याच अटी व शर्तीनुसार व कार्यपध्दतीनुसार व आवश्यकतेनुसार व मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने क्रीडा विभागामार्फत राबविणेस व सदर योजने अंतर्गत होणा-या प्रशिक्षणाचा खर्च नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेतील मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण या उपलेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर कामी जर जीएसटी (वस्तु व सेवा कर) देय असेल तर त्यानुसार रक्कम त्यांना अतिरिक्त (विहित दरा व्यतिरिक्त) अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लक्ष्मणशेठ सोपान सस्ते )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१००/२०१८
दिनांक : १२/०३/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.